ईमेलदवारे रवाना

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय.**
**नवीन प्रशासकीय इमारत, तळ मजला, विधान भवनसमोर, पुणे- 01**

क्र.का.4/ई-रजिस्ट्रेशन/प्र.क्र.193/परिपत्रक/2022/1823 दिनांक - 11/11/2022.

विषय- ई-रजिस्ट्रेशन प्रणाली मध्ये नोंदणीस दाखल दस्तऐवजांची नोंदणी विहीत कालावधीत पूर्ण करणेबाबत.

परिपत्रक -

महाराष्ट्र राज्याने नोंदणी अधिनियम, 1908 चे कलम 34, 35 व 69 मध्ये योग्य त्या सुधारणा करुन तसेच महाराष्ट्र ई-रजिस्ट्रेशन व ई-फायलिंग नियम, 2013 विहीत करुन सन 2014 पासून दस्तऐवज नोंदणीसाठी ई-रजिस्ट्रेशन सुविधा नागरिकांना उपलब्ध करुन दिलेली आहे. या ऑनलाईन सुविधेमध्ये विकासक आणि नागरिकांना त्यांचे सदनिकेच्या पहिल्या विक्रीचा व लिव्ह अँड लायसन्सचा दस्तऐवज नोंदणीसाठी ऑनलाईन सादर करता येतो. दुय्यम निबंधक यांना या प्रणालीद्वारे प्राप्त झालेला दस्तऐवज तपासून त्याची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने पूर्ण करण्यात येते. विकासकांना आणि नागरिकांना दुय्यम निबंधक कार्यालयात न येता दस्तऐवज नोंदणीची सर्व प्रक्रिया ऑनलाईन करता येत असल्यामुळे या सुविधेस राज्यातील नागरिकांकडून मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळालेला आहे.

या सुविधेमुळे दुय्यम निबंधक कार्यालयातील प्रत्यक्ष दस्त नोंदणीसाठी येणा-या नागरिकांचा वावर कमी झाल्याने दुय्यम निबंधक यांना इतर दस्तऐवजांच्या नोंदणीकडे जास्त लक्ष देणे शक्य होत आहे. परिणामी दुय्यम निबंधक कार्यालयातील कामकाजाचा दर्जा सुधारण्यास मदत होत आहे.

या पार्श्वभुमिवर ऑनलाईन दस्त नोंदणीसाठी सादर होणाऱ्या दस्तांचा निपटारा विहीत मुदतीत व कालबद्ध पद्धतीने होणे ही सर्व नोंदणी अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. यास्तव खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

ई-रजिस्ट्रेशन प्रणालीमधून नोंदणीसाठी दाखल होणा-या प्रथम विक्री करारनामे व लिव्ह ॲन्ड लायसेन्स करारनामे दस्तांची नोदंणी त्याच दिवशी किंवा अपरिहार्य परिस्थितीत पुढील कामकाजाच्या दिवशी पूर्ण होईल याची दक्षता सर्व नोंदणी अधिकाऱ्यांनी घ्यावी. कोणत्याही परिस्थितीत वर नमुद समय

सिमेचे उल्लंघन होणार नाही यास्तव सर्व सह जिल्हा निबंधक व नोंदणी उपमहानिरीक्षक यांनी त्यांचे अधिनस्त कार्यालयांना सुचित करावे. तसेच त्यावर संनियंत्रण ठेवावे.

उपरोक्त आदेशाप्रमाणे ऑनलाईन नोंदणीस सदर दस्तांची नोंदणी विहीत कालावधीत न केल्यास संबंधीत दुय्यम निबंधकांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सही/-
XXX
(श्रावण हर्डीकर)
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रत- 1) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक.

2/- यांना सुचित करण्यात येते की, अधिनस्त दुय्यम निबंधकांनी सदरचे परिपत्रक वाचले व समजले याबाबत त्यांची स्वाक्षरीकृत पोहोच घेऊन त्याचा एकत्रित अहवाल सादर करावा.

2) नोंदणी उपमहानिरीक्षक (संगणक)
3) सर्व कार्यासन अधिकारी.
4) सर्व सह जिल्हा निबंधक.
5) सर्व दुय्यम निबंधक (सह जिल्हा निबंधक यांचेमार्फत)

**निर्गमित,**

(गोविंद कराड)
**नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**